

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जून २०२५

# विद्यावार्ता

ई - मासिक

## जागतिक पर्यावरण दिन



विशेषांक

# विद्यावार्ता
ई - मासिक

# अनुक्रमणिका



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**मार्गदर्शक**

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रकाशक**

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संपादक**

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in


- विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचा कुलगुरूंच्या हस्ते शुभारंभ १
- विद्यापीठात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा ४
- विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील प्रवेशासाठी जाहिरात ६
- विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा पदवी वितरण समारंभ संपन्न ७
- विद्यापीठातर्फे विविध क्रीडा स्पर्धेत प्राविण्यप्राप्त चमूतील खेडाडू, व्यवस्थापक व प्रशिक्षक यांचा सत्कार १३
- विद्यापीठात शिवरायांचा ३५२ वा राज्याभिषेक दिन सोहळा उत्साहात साजरा
- विचारशलाका महानुभाव तत्वज्ञान विशेष अंकाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते विमोचन १५
- बुलडाणा येथिल मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थीनींची टी.सी.एस. कंपनीमध्ये निवड १६
- विद्यापीठातील रासायनिक तंत्रशास्त्र अभ्यासक्रमाची इयत्ता बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी १७
- आजीवन अध्ययन विभागातील विविध कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम १८
- विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात एम.एस्सी. भाग -१ साठी प्रवेश }
- विद्यापीठातील जैव तंत्रज्ञान विभागाकडून प्रवेश सुरू } १९
- विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक निरोप २०
- जयंती विशेष २२
- बातमी कात्रणे २४






# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात वृक्षारोपण कुलगुरूंच्या हस्ते शुभारंभ



वृक्षारोपण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेसह इतर मान्यवर

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात (गुरूवार ५ जून २०२५) वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. विद्यापीठाच्या परीक्षा विभागासमोर कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. नितीन कोळी, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, कार्यकारी अभियंता श्री. शशिकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री. अजय देशमुख, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**यावर्षी विद्यापीठात एक हजार वृक्षारोपण करणार – कुलगुरु**

यावेळी कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी सांगितले की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यावर्षी पावसाळी हंगामात विद्यापीठ परिसरात एक हजारपेक्षा जास्त नवीन वृक्षांचे रोपण करणार आहे. विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर ४५० एकरमध्ये पसरलेला असून, सध्या येथे साडेचार लाखांहून अधिक वृक्ष डौलदारपणे उभे आहेत. ज्यामुळे पर्यावरण संवर्धनात विद्यापीठाचे मोठे योगदान मिळत आहे.



पर्यावरण संवर्धनासाठी विद्यापीठाला यापूर्वी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पाच नामांकित पुरस्कार प्राप्त झाले आहेत, असेही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यावेळी नमूद केले.

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपापल्या परिसरात वृक्षारोपण करावे व पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहनही कुलगुरूंनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले.

**विद्यापीठ परिसर म्हणजे शहराचा 'ऑक्सिजन पार्क'**

विद्यापीठाच्या ४५० एकर परिसराचे 'अमरावती शहराचा ऑक्सिजन पार्क' असेही वर्णन यावेळी करण्यात आले. या परिसरात साडेचार लाखांहून अधिक विविध जाती-प्रजातींची झाडे आहेत. याव्यतिरिक्त दोन मोठे जलाशय आणि अनेक बंधारे असल्यामुळे जमिनीत मोठ्या प्रमाणात पाणी मुरते, ज्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी प्रचंड वाढली आहे. विविध पशुपक्षी आणि वृक्षांनी नटलेला हा परिसर निसर्ग सौंदर्यात भर घालत असून, विद्यापीठाचा परिसर पर्यावरण संवर्धनाचा एक मानबिंदू ठरला आहे.

वृक्षारोपण करण्याकरीता खड्डे खोदणे व वृक्षारोपणासंदर्भात सर्व कामे करण्याकरीता उद्यान विभागातील कर्मचारी व मजूरांनी अथक परिश्रम घेतलेत. यावेळी विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या



संख्येने उपस्थित होते.







## विद्यापीठातील निसर्गरम्य परिसर.....




















# विद्यापीठात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

## नियमित योग प्राणायाम आरोग्याची गुरूकिल्ली- कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




**योग प्राणायामचे महत्व विषद करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते**

सर्वांनी आपलं आरोग्य सुदृढ राहण्याकरिता नियमित योग, प्राणायाम करायला हवा. आरोग्याची ती खरी गुरूकिल्ली आहे. स्वत:बरोबर सामाजिक स्वास्थ्य सुदृढ राहण्यासाठी योग आणि प्राणायामचा प्रचार व प्रसार करावा, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम.ए. योगशास्त्र, पी.जी. डिप्लोमा योगा थेरपी व पी.जी. डिप्लोमा नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स व्दारा ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस विद्यापीठात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र कडू, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, आंतरराष्ट्रीय योग चिकित्सक, पुणे येथील योग प्रशिक्षक डॉ. सुप्रिया चकोले उपस्थित होते.

विद्यापीठ परिसरामध्ये आंतरराष्ट्रीय योग चिकित्सक, पुणे येथील योग प्रशिक्षक डॉ. सुप्रिया चकोले यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वास्थ्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, अमरावती येथील योग तज्ज्ञ व वैद्यकीय व्याख्याता डॉ. संगीता सौंदळे यांनी उपस्थितांकडून योगाभ्यास व प्राणायाम करुन घेतला. विविध प्रकारच्या योगाभ्यासाचा शरीराच्या विविधांगी भागाला कसा उपयोग होतो, याची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. कुलगुरू पुढे म्हणाले, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी अतिशय चांगला उपक्रम योगशास्त्र अभ्यासक्रमाच्यावतीने आयोजित केला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी नवनवीत संकल्पना राबवित विविध अभ्यासक्रम सुरू केलेत. यावर्षीच्या योग दिनाकरिता 'वन अर्थ, वन हेल्थ' ही थीम आहे. मानवीय आरोग्य खूप महत्वाचे आहे. पैशाच्या मागे न लागता आरोग्याकडे लक्ष देणे अधिक महत्वाचे असून तीच खरी संपत्ती असल्याचे कुलगुरू म्हणाले.



**योग प्राणायामची माहिती देतांना योग प्रशिक्षक डॉ. सुप्रिया चकोले व डॉ. संगिता सौंदळे**

**भारतीय योगाभ्यास अधिक उपयुक्त – डॉ. रवींद्र कडू**

योगाभ्यासातून शरीरशुध्दी होते, त्यापाठोपाठ व्याधी सुध्दा दूर होतात. अनेक सूत्र पतंजलीने दिले आहेत. योग दिवसाला उन्हाळी संक्रांत दिवस मानतात. पाश्चिमात्य व्यायाम व योगा यात फरक आहे. भारतीय योगाभ्यासामध्ये दिलेल्या मूळ स्थितीत प्रत्येकाने आसन करणे गरजेचे असून त्यातून आपल्याला चांगले आरोग्य नक्कीच मिळेल, असेही ते म्हणाले.

विद्यापीठ आरोग्य केंद्राच्यावतीने आरोग्य मंत्रालयाच्या सूचनेनुसार नेत्रदानाचे अर्ज भरुन देण्याचे आवाहन याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. श्रीकांत पाटील, सूत्रसंचालन डॉ.अनघा देशमुख यांनी, तर आभार डॉ. अश्विनी राऊत यांनी मानले. योग दिन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. स्वप्निल इखार, प्रा. आदित्य पुंड, डॉ. अश्विनी राऊत, प्रा. राधिका खडके, प्रा. राहुल दोडके, प्रा. प्रफुल्ल गांजरे, डॉ. अनघा देशमुख यांनी परिश्रम घेतले.





योग प्राणायाम करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते,प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालक डॉ. श्रीकांत पाटील व इतर मान्यवर

# विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील प्रवेशासाठी जाहिरात

## Sant Gadge Baba Amravati University Admission Notice 2025-26

Online applications are invited for admission to various PG courses viz. **M.A. in** (Translation Hindi, Marathi, Sociology, Gender Women Studies, Dr. Babasaheb Ambedkar Thoughts, Counselling & Psychotherapy, Life Long Learning & Extension, Master of Performing Art (MPA) – Dance & Theatre, Dance (Katthak), Psychology, Pali and Buddhism, English, Yoga Shastra, Functional English, Sanskrit, Chhatrapati Shivaji Maharaj Thoughts & Mgt.) / **M.Sc. in** (Chemistry, Physics, Mathematics, Botany, Zoology, Statistics, Geology, Microbiology, Computer Science, Applied Electronics, Biotechnology (Through Entrance) and Home Science, **B.L.I.Sc./ M.L.I.Sc./ LL.M.**/ **P.G. Diploma in** (Cyber Law/ Intellectual & Property Law/ Human Right Education/ Computer Science /E-learning & M-Learning/ Watershed Technology & Management/ Yoga Therapy/ Communication Skills in English and Counselling & Psychotherapy) in prescribed format available on website https://sgbauadm.samarth.edu.in/test.php from 02 /07/2025 at 10.30 AM onwards. Before submitting the application form, the applicant should pay online Rs. 300/- for Open category and Rs. 200/- for Reserved Category. Applicant should attach the online payment receipt to the **print out of the application form and submit** the same by Post/ By hand delivery along with all necessary documents to the **Chairman, Central Admission Committee, Seminar Hall, Department of Botany, Sant Gadge Baba Amravati University, Amravati - 444602 (M.S.)**. For detail please visit https://sgbau.ac.in/

**Registrar**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभागातील प्रवेशासाठी जाहिरात प्रकाशित झाली आहे.



# आजीवन अध्ययन विभागाचे अभ्यासक्रम विद्यार्थी व समाजाशी सुसंगत -प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

## विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा पदवी वितरण समारंभ संपन्न

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील अभ्यासक्रम हे विद्यार्थी केंद्रित व समाजाशी सुसंगत असल्यामुळे समाजातील सर्वच घटक या अभ्यासक्रमांना प्रवेशित होऊ शकतो, ही खरोखरच गौरवाची आणि अभिमानाची बाब आहे. विद्यार्थी विकासाबरोबरच समाज विकासाच्यादृष्टीने हा विभाग सतत प्रयत्नरत असतो. यासाठी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांची नेहमीच विशेष भूमिका दिसून येते. या नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी वितरण समारंभातून नक्कीच प्रेरणा मिळेल, असे प्रतिपादन प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने आयोजित पदवी वितरण समारंभात अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. समारंभाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे, प्रमुख अतिथी म्हणून आजीवन अध्ययन व विस्तार मंडळाचे सदस्य डॉ. रवींद्र सरोदे, विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. सुभाष गावंडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. ढोरे यांनी सर्व पदविकांक्षींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्यात.

प्राचार्य डॉ. दीपक धोटे म्हणाले, आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील अभ्यासक्रम हे काळानुरुप असल्यामुळे सर्वच घटकांना निश्चित फायदा होईल. हे अभ्यासक्रम केवळ विद्यार्थी हिताचेच नसून समाजहिताचे सुद्धा आहेत, त्यामुळे विद्यार्थी आपला सर्वांगीण विकास अभ्यासक्रमातून पूर्ण करू शकतो. विभागामध्ये सुरु असलेल्या इंग्रजी संवाद कौशल्य अभ्यासक्रमाचेही त्यांनी कौतुक केले. सर्व पदविकांक्षींना पदवी वितरित करून त्यांनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

पदवी वितरण समारंभात विभागातील एम. ए. समुपदेशन व मानसोपचार अभ्यासक्रमाच्या ३२, एम. ए. योगशास्त्रच्या ३२, एम.ए. आजीवन अध्ययन व विस्तारचे ३०, एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि




अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे २६, पी. जी. डिप्लोमा नॅचरोपॅथी अँड योगिक सायन्स अभ्यासक्रमाचे ४१, पी. जी. डिप्लोमा कम्युनिकेशन स्किल इन इंग्लिश अभ्यासक्रमाचे २२, पी.जी डिप्लोमा योग थेरपी अभ्यासक्रमाचे २९ आणि पी.जी. डिप्लोमा समुपदेशन व मानसोपचार अभ्यासक्रमाच्या २६ अशा एकूण २३८ गुणवत्ता यादीत व प्राविण्यसह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर मिळिवलेल्या यशाचा गुणगौरव व्हावा, यासाठी विविध अभ्यासक्रमातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता पदवी वितरण समारंभ हा महत्त्वाचा ठरतो. अशा समारंभामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला नवीन प्रेरणा मिळते, शिवाय रोजगाराच्या दृष्टीने नवी दिशा मिळण्यासही मदत होते. या दृष्टिकोनातून या पदवी वितरण समारंभाचे आय़ोजन करण्यात आले. विभागाचे संचालक डॉ श्रीकांत पाटील यांनी प्रस्ताविकेतून समारंभ आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी राऊत व प्रा. आदित्य पुंड यांनी, तर आभार प्रा. वैभव जिसकार यांनी मानले. समारंभाला विभागातील सर्व प्राध्यापक, बहुसंख्य विद्यार्थी व त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

## पदवी वितरण समारंभातील क्षणचित्रे


















## पदवी वितरण समारंभातील क्षणचित्रे


















## पदवी वितरण समारंभातील क्षणचित्रे






समारंभाला उपस्थित विद्यार्थी, पालक व इतर मान्यवर



# खेळाडूंनी वाढविला विद्यापीठाचा नावलौकिक - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
## विद्यापीठातर्फे विविध क्रीडा स्पर्धेत प्राविण्यप्राप्त चमूतील खेळाडू, व्यवस्थापक व प्रशिक्षक यांचा सत्कार



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

विद्यापीठाच्या खेळाडूंनी दक्षिण–पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करुन विद्यापीठाला विविध पदके व पारितोषिके प्राप्त करुन दिली आहेत. या सर्व खेळाडूंनी विद्यापीठाचा नावलौकिक देशपातळीवर पोहचविला असून त्यात गौरवास्पद भर घातली आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने २०२४–२५ मधील दक्षिण–पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये प्राविण्यप्राप्त चमूतील खेळाडूंना रोख पुरस्कार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून तसेच चमू व्यवस्थापक आणि प्रशिक्षक यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. विकास टोणे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तनुजा राऊत उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, पदक मिळिवणे सोपे नाही. पारंपारिक विद्यापीठांसह खाजगी विद्यापीठातील खेळाडू सुद्धा या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. खाजगी विद्यापीठे अद्ययावत सुविधा खेळाडूंना पुरवितात, त्या तुलनेत आपल्या खेळाडूंना कमी सुविधा असतात. तरी विद्यापीठाच्यावतीने खेळाडूंसाठी विविध सोयी–सवलतीमध्ये विद्यापीठाने वाढ केली आहे. रेल्वेतून ए.सी. कोचमध्ये प्रवासाची सुविधा विद्यापीठाने उपलब्ध करुन दिली असून भत्त्यामध्ये सुद्धा वाढ केली आहे.

शारीरिक शिक्षकांची संख्या सेवानिवृत्तीमुळे कमी होत असली, तरी ज्या शिक्षकांकडे प्रभार दिल्या जातो, ते अधिक जबाबदारीने काम करतील. नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरीता सर्व समस्यां व अडचणींवर शिक्षकांनी मात करावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. ए.आय. चा सुद्धा क्रीडा क्षेत्रात वापर वाढवावा. आयोजित कार्यशाळेतून अद्ययावत ज्ञान व क्रीडा कौशल्ये शिक्षकांनी प्राप्त करुन आपल्या खेळाडूंपर्यंत पोहचवावी, अशी अपेक्षा व्यक्त करुन विद्यापीठात सिन्थेटिक ट्रॅक व बहुउद्देशीय क्रीडा इमारत निर्माण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू पुढे म्हणाले, सर्व खेळाडू, चमू व्यवस्थापक व प्रशिक्षकांनी अतिशय मेहनत घेतल्यामुळे अनेक पारितोषिके प्राप्त करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात राष्ट्रीय स्तरावर भर घातली आहे. त्या सर्वांचे त्यांनी विद्यापीठाच्यावतीने अभिनंदन केले. भविष्यात आमचे खेळाडू आणखी पदके व पारितोषिके प्राप्त करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, देश पातळीवर दैदिप्यमान यश सर्व उत्कृष्ट खेळाडूंनी मिळिवले आहे. कार्यशाळेच्या माध्यमातून सर्व क्रीडा विषयावर तज्ज्ञ विचार मांडतील, त्यावर साधक–बाधक चर्चा होवून त्याचा उपयोग क्रीडा शिक्षणाचा विकास होण्याकरीता निश्चितच होईल. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी क्रीडा स्पर्धेच्या आयोजनामध्ये क्रीडा प्रशिक्षक व व्यवस्थापक अथक परिश्रम घेतात. कुलगुरू सुद्धा आपणा सर्वांच्या पाठीशी आहेत. अनेक सुविधा व संधी खेळाडूंना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, त्यामुळे भविष्यात आमचे खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाच्या नावलौकिकात आणखी भर घालतील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांचे हस्ते कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम व कार्यशाळा आयोजनामागील भूमिका क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी मांडली. संचालन डॉ. रुपाली टोणे व श्री संतोष वानखडे यांनी, तर आभार डॉ. चिंचमलातपुरे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे तसेच शारीरिक शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, पाचही जिल्ह्यांतील क्रीडा संचालक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यशाळा**

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगांव पेठचे डॉ. श्रीकांत माहुलकर व नाशिकचे डॉ. राजेश क्षत्रिय यांनी, दुसऱ्या सत्रात श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या डॉ. कविता वाटाणे व यवतमाळचे डॉ. अनुप कोठारी, तिसया सत्रात सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाचे डॉ. सागर नारखेडे व नागपूरच्या डॉ. माधवी मार्डीकर, तर चवथ्या सत्रात कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचे डॉ. अजय बोंडे व अमरावतीचे श्री आशिष देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. समारोपीय समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रविण रघुवंशी उपस्थित होते.



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचे समवेत प्राविण्यप्राप्त चमूमधील खेळाडू व्यवस्थापक तसेच प्रशिक्षक



कार्यशाळेला उपस्थित क्रीडा संचालक, विद्यार्थी खेळाडू

# विद्यापीठात शिवरायांचा ३५२ वा राज्याभिषेक दिन सोहळा उत्साहात साजरा



**छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करुन स्वातंत्र्याचा सूर्य दाखविला - शिवव्याख्याते डॉ. चौधरी**



विषयाची मांडणी करतांना डॉ. दिलीप चौधरी

आपण कोणाचे गुलाम नाही. आपले स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे, त्या राज्याला स्वत:चे धोरण असावे, स्वराज्याची संकल्पना लोकांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करुन रयतेला स्वातंत्र्याचा सूर्य दाखविला, असे प्रतिपादन छत्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालयाचे प्राचार्य शिवव्याख्याते डॉ. दिलीप चौधरी यांनी केले. विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती सभागृहात आयोजित छत्रपती शिवरायांचा ३५२ वा राज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त 'शिवराज्याभिषेक एक क्रांतिकारक घटना' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष श्री मनोहर कडू, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे व विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. चौधरी म्हणाले, यदुनाथ सरकार यांनी शिवचरित्र लिहित असतांना छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा हा संपूर्ण प्रांतावर स्वायत्तता व सार्वभौमत्व रुजविण्यासाठी घेण्यात आला, असे सांगितले. रयतेचे राज्य महाराजांना निर्माण करायचे होते. राज्यातील अठरापगड जातीतील लोकांना एकत्रित करुन त्यांच्या मनामध्ये स्वराज्याची संकल्पना रुजावी आणि त्या सर्व मावळ्यांचा राज्याचे प्रशासन, संरक्षण व इतर बाबींसाठी सहभाग असावा, याकरीता त्यांनी स्वत:चा राज्याभिषेक करुन घेतला. राज्याभिषेक सोहळा महाराजांनी का आयोजित केला, यावर विविध उदाहरणे देवून त्याचे महत्व यावेळी वक्त्यांनी पटवून दिले.

ते पुढे म्हणाले, मुघलांशी लढतांना महाराजांनी आपल्या सैन्यात सर्व जातीधर्मांच्या आणि विशेषत: मुस्लीमांना सुद्धा सहभागी करुन घेतले होते, यावरुन महाराजांच्या राज्यातील सर्व–धर्म–समभावाची संकल्पना आपल्याला दिसून येते. आपल्या देशात मुघलांचे राज्य होते. परकीय डच, पोर्तुगीज, इंग्रज हे व्यापार करतांना मुघलांशी व्यापार करायचे, कारण छत्रपतींना राजा म्हणून मान्यता ते देत नसे. परकीय व्यापार व्हावा, आपल्या राज्याचा विकास व्हावा, यादृष्टीने महाराजांचा राज्याभिषेक महत्वाचा होता आणि म्हणून त्यांनी तो केला. राज्याभिषेक सोहळ्यानंतर महाराज एक सम्राट म्हणून त्याकाळी उदयास आले.

शिवराज्याभिषेक सोहळ्याचे महत्व आपल्याला टीकून ठेवता यावे, म्हणून अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे महत्व त्यांनी अधोरेखीत केले. राजमाता जिजाऊंनी ३२ मण सोन्याचे सिंहासन त्याकाळी बनवून घेतले. आपले राज्य श्रीमंतांच आहे. रयतेमध्ये राज्याविषयी प्रचंड आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि शत्रूचे खच्चीकरण, त्यांच्यामध्ये दशहत निर्माण व्हावी, यादृष्टीने ती घटना योग्य होती. महाराजांची युद्धनिती उत्कृष्ट होती, तसेच त्यांची प्रशासन व्यवस्था सुद्धा मजबूत होती. त्यांनी आपल्या कार्यकाळामध्ये अनेक किल्ले जिंकलेत आणि राज्याभिषेक सोहळ्यातून सार्वभौमत्व टीकावे, हे राज्य सर्वसामान्यांचे आहे, ही भावना सर्वांमध्ये निर्माण व्हावी, हाही एक उद्देश होता, असेही ते म्हणाले.

विद्यार्थ्यांना उद्देशून ते पुढे म्हणाले, शिवचरित्राचे सर्वांनी वाचन करुन ते अंमलात आणण्याची आज खरी गरज आहे. शिवाजी महाराजांच्या मनामध्ये जी उत्तरदायित्वाची भावना होती, त्याचा सर्वांनी विशेषत: विद्यार्थ्यांनी शिवचरित्राच्या माध्यमातून अभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. शिवराज्याभिषेक ही खऱ्याअर्थाने रयतेमध्ये राष्ट्रप्रेम निर्माण करणारी घटना होती, असेही त्यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून महापुरुषांचे विचार जनमाणसामध्ये आणि विशेषत: विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न निरंतर राहिला आहे. आमचे विद्यार्थी महाराजांच्या विचार व कार्याचा अभ्यास करुन खऱ्याअर्थाने महाराजांना अपेक्षित असलेले स्वराज्य निर्माण करण्यामध्ये हातभार लावतील, असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन, प्रशासन, राजनिती, धोरण आणि जीवनकार्य अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना शिकविल्या जात असून त्यामध्ये महाराजांची राजकीय, सांस्कृतिक, युद्ध विषयक व प्रशासकीय नितीमूल्ये यांचा समावेश आहे. आमचे विद्यार्थी देशाच्या प्रगतीकरीता महाराजांच्या विचारनुसार कार्य करतील. परकीय व असंहिष्णू सत्तेविरुद्ध लढा देण्यासाठी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा महत्वाचा ठरला असल्याचेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीताने झाली. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी गुणवत्ता यादीत स्थान मिळिवल्याबद्दल सौ. सोनाली कान्हेरकर यांचा सन्मानचिन्ह देवून मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. शिवगर्जना प्रा. आदित्य पुंड यांनी, तर शंखनाद श्री दिपक अडसड यांनी केला. याप्रसंगी रोपटं देवून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्तविकतेतून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी शिवराज्याभिषेक दिनाचे महत्व विषद केले व कार्यक्रम आयोजनामागील भूमिका मांडली. संचालन प्रा. आश्विनी राऊत यांनी, तर आभार प्रा. राम ओलीवकर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




व्याख्यान कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

## विचारशलाकाचे वैचारिक साहित्यामध्ये मौलिक योगदान - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## 'विचारशलाका' महानुभाव तत्वज्ञान विशेष अंकाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते विमोचन



विचारशलाका या नियतकालिकेचे विमोचन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

विचारशलाका या त्रैमासिकाचे महाराष्ट्रातील वैचारिक साहित्यामध्ये मौलिक योगदान असल्याचे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी डॉ. नागोराव कुंभार संपादित विचारशलाकाच्या महानुभाव तत्वज्ञान विशेषांकाचे विमोचन करतांना केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संपादक डॉ. नागोराव कुंभार, अतिथी संपादक डॉ. संतोष ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, विचारशलाका महानुभाव तत्वज्ञानावर आधारित अंकाचे विमोचन माझ्या हस्ते व्हावे, अशी अपेक्षा संपादक डॉ. कुंभार यांनी व्यक्त केली, त्यास मी होकार दिला. आज मला खूप आनंद होत आहे की, माझ्या हस्ते या अंकाचे विमोचन या ठिकाणी झालेले आहे. मराठीतील पहिला ग्रंथ लीळाचरित्र हा अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर या ठिकाणी लिहिल्या गेला. आपल्या मातृभाषेतील पहिला ग्रंथ असल्याचा आम्हां सर्वांना अभिमान आहे. समाज विकासासाठी श्री चक्रधर स्वामींनी दिलेले तत्वज्ञान खूप महत्वाचे असून त्याचा अभ्यास सर्वांनी करावा, असे सांगून संपादक डॉ. नागोराव कुंभार, अतिथी संपादक डॉ. संतोष ठाकरे व संपादक मंडळाचे त्यांनी अभिनंदन केले. डॉ. कुंभार यांच्या हातून असेच कार्य भविष्यातही घडत राहो, अशा शुभेच्छा सुद्धा कुलगुरुंनी याप्रसंगी दिल्यात.

विचारशलाकाच्या ५०० पृष्ठाच्या या विशेषांकामध्ये ४७ लेखांचा समावेश आहे. यामध्ये महानुभाव तत्वज्ञानाच्या विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकणाऱ्या डॉ. जनार्दन वाघमारे, यशवंत मनोहर, आ.ह. साळुंखे, इंद्रजित भालेराव, डॉ. संतोष ठाकरे, डॉ. श्रीधर आकाशकर, डॉ. युवराज शास्त्री, प्रा. दिपक तायडे, मा.रा. लामखडे, सतीश बडवे, नरेंद्र लांजेकर, रणधीर शिंदे आदी मान्यवर, विचारवंत, साहित्यिक आणि संशोधकांच्या लेखांचा समावेश आहे. वाचकांना महानुभाव तत्वज्ञान समग्ररित्या समजून घेण्यासाठी या विशेषांकाचा निश्चितच लाभ होणार आहे. विचारशलाकाने यापूर्वी चार्वाक तत्वज्ञान, बौद्ध तत्वज्ञान, जैन तत्वज्ञान, महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान असे महत्वपूर्ण विशेषांक काढून विचारविश्व समृद्ध केले आहे.

याप्रसंगी डॉ. नागोराव कुंभार यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचा शाल, श्रीफळ देवून सत्कार केला. अतिथी संपादक डॉ. संतोष ठाकरे मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, लीळाचरित्रात समाज जीवन आहे, निसर्ग आहे, भौगोलिक वर्णन सुद्धा अतिशय सुंदर रितीने केले आहे. ८०० वर्षांपूर्वी महिलांना सन्मान महानुभाव तत्वज्ञानामुळे मिळाला. त्याकाळी महिलांना कुठलेच अधिकार नव्हते, ते अधिकार त्यावेळी महिलांना दिल्या गेले. महिलांकडून दीक्षा सुद्धा दिल्या गेली.

प्रास्ताविक महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर यांनी केले. संचालन व आभार डॉ. संदीप जुनघरे यांनी मानले. यावेळी डॉ. अण्णा वैद्य, डॉ. वानखेडे, डॉ. संदीप जुनघरे, प्रा. सिमा मेटकर, श्री अनंत तेलखडे, श्री गोवर्धन तेलखडे, सौ. प्रतिभा भूगूल, श्री सतिश मानकर, सौ. रजनी घोरमाडे, डॉ. मेहरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थीनींची टी.सी.एस. कंपनीमध्ये निवड कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते विद्यार्थीनींचा सत्कार

येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये वाणिज्य विभागात शिकत असलेल्या आणि टाटा कन्सल्टन्सी सद्रव्हसेस (टी.सी.एस.) या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या माहिती तंत्रज्ञान कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ नुकताच महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहात पार पडला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगावच्या कॅम्पस मुलाखतीतून (कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह) टी.सी.एस.मध्ये निवड झालेल्या दोन विद्यार्थिनींचा यावेळी सन्मान करण्यात आला. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी कु. प्रियंका वैष्णव व कु. वैष्णवी पवार यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आजच्या स्पर्धात्मक युगात कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाने यश नक्कीच मिळते, हे या विद्यार्थीनींनी सिद्ध केले आहे. मॉडेल डिग्री महाविद्यालयाने नेहमीच विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांना व्यावसायिक जगासाठी तयार करण्यावर भर दिला आहे. आजचे हे यश त्याचेच फलित आहे, असे उद्गार याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. यावेळी टीसीएसमध्ये निवड झालेल्या विद्यार्थीनींनी सुध्दा आपले अनुभव कथन केले. महाविद्यालयातील शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन आणि प्लेसमेंट सेलने केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिष्ठता डॉ. मोना चिमोटे, श्री. मंगेश वरखडे, श्री शशिकांत रोडे, महाविद्यालयाचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे, डॉ. कि.वा. वाघ उपस्थित होते.



विद्यार्थीनींचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते






# विद्यापीठातील रासायनिक तंत्रशास्त्र अभ्यासक्रमाची इयत्ता बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रासायनिक तंत्रशास्त्र विभागाच्या अभ्यासक्रमाची इयत्ता बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी मिळणार आहे. सदर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना मोठमोठ्या कंपन्यांमध्ये मोठ्या पगाराची नोकरी मिळू शकते. त्यामुळे रासायनिक तंत्रशास्त्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांनी आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे.

बारावीनंतर विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध आहे. त्यामध्ये केमिकल टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम एक चांगला पर्याय आहे. बी.टेक. हा रोजगारभिमुख व कौशल्याधारित चार वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम आहे. यामध्ये फुड टेक्नॉलॉजी, पल्प अॅन्ड पेपर टेक्नॉलॉजी, आईल अॅन्ड पेंट टेक्नॉलॉजी, पेट्रोकेमिकल टेक्नॉलॉजी असे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकता येतात. सदर अभ्यासक्रम केवळ विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागातच उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना उत्तम करिअर घडविण्याची चांगली संधी आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षण, संशोधन, उत्पादन, सेवा इ. क्षेत्रामध्ये नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध आहेत. अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ६० जागा असून प्रथम वर्षाचे प्रवेश राज्य तंत्रशिक्षण संचालनालय यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रिया (एमएच–सीईटी) मधून करण्यात येतात. अभ्यासक्रमाकरिता शासकीय नियमानुसार खुल्या प्रवर्गासाठी रु.२४,६९६/–, मागासवर्गीयांसाठी रु. ९,६९६/–, अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार सवलती मिळतात.

सदर अभ्यासक्रम पूर्ण करणारे अनेक विद्यार्थी संशोधन, औधोगिक क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत केमिकल टेक्नॉलॉजी विभागात मार्गदर्शन कक्ष सुरू करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी अधिक माहितीकरिता डॉ. पी.के.वानखडे, ९४०५९७५२७३, सी. बी. धीरवस्सी, ९४२२५४३२६८ यांचेशी प्रत्यक्ष किंवा मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच विद्यापीठाच्या ६६६.द्मढ़डठ्ठद्व.ठ्ठड़.त्द या संकेतस्थळावर जावून केमिकल टेक्नॉलॉजी विभाग पृष्ठास भेट द्यावी, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. ए. बी. नाईक यांनी केले आहे.

# आजीवन अध्ययन विभागातील विविध कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम

आजच्या स्पर्धात्मक काळात रोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकास हा महत्वाचा घटक मानला जातो. सुजलाम-सुफलाम समजल्या जाणाया विकसनशील भारतामध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक असलेले दिसून येते, यामुळे तरुणांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होऊन काहींचे करिअर संपुष्टात आले आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्वांनाच रोजगार मिळेल याची शाश्वती नसतांनाही हजारो तरुण उच्च शिक्षणाच्या जाळ्यात अडकले जातात. परिणामी त्यांना बेरोजगारीला सामोरे जावे लागते. ही ज्वलंत समस्या नियंत्रणात यावी, यासाठी भारत सरकारने कौशल्यपूर्ण शिक्षणाला प्राधान्यक्रम दिला आहे. शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे अनेक विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांसाठी कौशल्यपूर्ण शिक्षण बंधनकारक केले असून, विद्यार्थी केंद्रित अभ्यासक्रम सुरू करण्यावर भर दिलेला दिसून येतो. याच उद्देशाची पूर्तता करण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार कौशल्य विकासावर आधारित एम.ए. आजीवन अध्ययन व विस्तार हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०१९-२० पासून यशस्वीरित्या सुरू आहे.

अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक काळात स्वतःची ओळख निर्माण करता यावी व कौशल्यपूर्ण शिक्षणातून त्यांना आत्मनिर्भरता प्राप्त व्हावी यासाठी सदर अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी यासाठी मूल्य शिक्षणाचे धडे सुद्धा या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून देण्यात येते. युवा वर्गामध्ये संस्कृती आणि मानवीय मूल्यांचा विसर पडलेला दिसतो. या परिस्थितीमध्ये कुठेतरी बदल व्हावा व संस्कारमय समाज निर्माण व्हावा, या आधारावर विद्यार्थ्यांना लाईफ स्किल्स एज्युकेशन सुद्धा शिकविल्या जाते. हा अभ्यासक्रम केवळ वर्गात शिकविण्यापुरताच मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध सर्जनशील उपक्रम व प्रशिक्षणाची अंमलबजावणी सुद्धा या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करण्यात येते. कौशल्य विकास हा घटक केंद्रस्थानी ठेवून याद्वारे विद्यार्थांचा व्यावसायिक व रोजगाराभिमुख विकास साध्य करण्यासाठी विविध विषयांवर परिसंवाद, व्याख्याने, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय परिषदा आयोजित करण्यात येतात. त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष धडे व सराव करून घेण्यात येतो, जेणेकरून विद्यार्थी शासकीय वा खासगी क्षेत्रामध्ये गेल्यानंतर त्यांना कार्य करतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी जाणार नाही. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थांमध्ये कार्य करण्याची आवश्यक कौशल्य कोणती असावी याबाबत यथायोग्य मार्गदर्शन व त्यासंबंधित असलेले प्रशिक्षण देण्यात येते. याचीच फलश्रृती म्हणून उत्तीर्ण झालेले बहुतांश विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांमध्ये कार्य करुन रोजगार प्राप्त केला आहे. तर काही विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्यवसाय सुरू केले आहेत. एवढेच नव्हे तर या अभ्यासक्रमामध्ये दरवर्षी समाजातील गृहिणी महिला, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, लघू व्यावसायिक प्रवेश घेतात. या घटकांना केंद्रस्थानी ठेवून वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकासाबाबत असलेले धडे, शासकीय किंवा खासगी क्षेत्रामध्ये कार्य करण्याची कार्यपद्धती, संवाद कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य अश्या प्रकारचे नाविन्यपूर्ण कौशल्य विकसित करण्यावर अधिक भर असतो. समाजातील अनुभवसंपन्न घटक म्हणून ओळखल्या जाणाया ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करण्यात येते. सदर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी एन.जी.ओ, सेवाभावी संस्था, आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, समाजकल्याण विभाग व इतर शासकीय व खासगी ठिकाणी कार्य करण्यासाठी पात्र ठरू शकतो. याबरोबरच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक दिशा व कौशल्य विकसित करता येतात.

**पात्रता :**

कोणत्याही शाखेचा पदवीधर विद्यार्थी, गृहिणी महिला, लघू व्यावसायिक, ज्येष्ठ नागरिक, वयाची अट नाही, कोणत्याही वयातील व्यक्ती या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतो. विद्यापीठाच्या थेट आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये जावून आवश्यक कागदपत्रांसह आपण आपला प्रवेश निश्चित करू शकता.

अभ्यासक्रमाचा कालावधी : २ वर्ष ( ४ सेमीस्टर ), ऑफलाईन व ऑनलाईन दोन्ही पध्दतीद्वारे तासिका घेण्यात येतात.

अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. प्रशांत भगत (९५८८४५३१०७), प्रा.वैभव जिसकार (९१३०४५१९४९) यांच्याशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळिवण्यात येत आहे.

## विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात एम.एस्सी. भाग-१ साठी ४० प्रवेशक्षमता

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाची प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. रसायनशास्त्र विभागात अत्याधुनिक संशोधन आणि समग्र विद्यार्थी विकास साधला जातो. विभागाने आपली प्रतिष्ठा सातत्याने कायम ठेवली असून दरवर्षी ४० विद्यार्थी आपले पदव्युत्तर शिक्षण घेतात. विज्ञान विद्याशाखा अंतर्गत पीएच.डी. प्रोग्राममध्ये सुध्दा प्रवेश देण्यात येत असतात. प्रवेश प्रक्रिया ही गुणवत्तेनुसार आणि विद्यापीठाच्या निकषांवर आधारित होते. १९९० मध्ये स्थापन झालेला रसायनशास्त्र विभाग उत्कृष्टतेचे केंद्र बनला आहे.

कुशल रसायनशास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षक आणि उद्योग व्यावसायिक तयार करतो. विभागात सध्यस्थितीत कार्बनी रसायनशास्त्र (ऑर्गेनिक केमिस्ट्री) आणि अकार्बनी रसायनशास्त्र (इनऑर्गेनिक केमिस्ट्री) व भौतिकी रसायनशास्त्र (फिजिकल केमिस्ट्री) हे तीन विषय शिकविले जात असून सध्या उद्योग विश्वातील मनुष्यबळाची आवश्यकता बघता या अभ्यासक्रमात बदल करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. विभागामध्ये पायाभूत सुविधा, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, आयसीटी-सक्षम वर्गखोल्या, सुसज्ज प्रयोगशाळा, संशोधन उपकरणाने सुसज्ज आहे. प्रवेशानंतर विद्यार्थी पदव्युत्तर पदवीसाठी कार्बनी, अकार्बनी, भौतिकी रसायनशास्त्र अशा तीन विषयापैकी एक विषय निवडू शकतात. ग्रीनकेमिस्ट्री, कॅटॅलिसिस, नॅनोटेक्नॉलॉजी, कॅटॅलीसीसमध्ये नाविन्यपूर्ण संशोधनात विभाग सक्रिय आहे. विभागातील प्राध्यापकांनी नामांकित जर्नल्समध्ये पेपर्स प्रकाशित केले आहेत.

विद्यार्थ्यांना संशोधन, शासकीय प्रयोगशाळा, औषधी उद्योग, स्टील उद्योग, मटेरीअल सायन्स, मोल्युक्युल मॉडेलिंग, शिक्षण तसेच इतर अनेक उद्योग विश्वात काम करण्याच्या संधी उपलब्ध आहेत. विभागाची आणखी एक उपलब्धी म्हणजे विद्यार्थ्यांना फॉरेन्सिक विभाग, वीज निर्मिती कंपनी, खाद्य व अन्न निरीक्षक, जिओ केमिस्ट्री, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, शिक्षक म्हणून नियुक्ती मिळाली आहे. कार्यशाळा, चर्चासत्रे, राष्ट्रीय परिषदा, औद्योगिक भेटी, प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यक्रम, प्रश्नमंजुषा स्पर्धा, मॉडेल प्रदर्शनी अशा माध्यमातून विद्यार्थी विकासावर भर दिला जातो. अनेक पदवीधरांना औषध कंपन्या, शैक्षणिक संस्था, संशोधन आणि विकास प्रयोगशाळा, सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्स आणि आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांमध्ये प्लेसमेंट मिळाले आहे. तसेच नेट, गेट, सेट आणि सीएसआयआर-जेआरएफ सारख्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी देखील विभागाची विद्यार्थ्यांना मोठी मदत मिळते. प्रवेश घेऊ इच्छित विद्यार्थ्यांनी अधिक माहितीकरिता संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे यांनी केले आहे.

## विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागात प्रवेश सुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभाग १९९४ पासून सुरु झाला असून महाराष्ट्र शासनाकडून विभागाला अर्थसहाय्य प्रदान करण्यात आले आहे. देशभरात नावलौकीक असलेल्या जैवतंत्रज्ञान अभ्यासक्रमाला हजारोंच्या संख्येने विद्यार्थी प्रवेश घेऊन आपले भविष्य घडवित आहेत व सध्या देशाच्या विविध नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थी कार्यरत आहेत, ही मोठी उपलब्धी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागाने साधली आहे.

जैवतंत्रज्ञान हा पदव्युत्तर अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून नवनव्या संशोधनासह एम.एस्सी. अभ्यासक्रमात आण्विक जीवशास्त्र, जेनेटिक अभियांत्रिकी, बायोइन्फॉरमॅटिक्स, वनस्पती ऊती संवर्धन, बायोकेमिकल अभियांत्रिकी, किण्वन जीवशास्त्र, विश्लेषणात्मक तंत्रे, सेल जीवशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, बायोकेमिस्ट्री यांसारख्या विविध शाखांमधील सिद्धांत आणि प्रात्यक्षिकांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, औषध शोध, फायटोसेकंडरी मेटाबोलाइट्स आणि त्यांची जैवक्रियाशीलता, प्रथिन रचना विश्लेषण, कर्करोग जीवशास्त्र, आयपीआर, नॅनोटेक्नॉलॉजी यांसारख्या वैकल्पिक विषयांचाही समावेश आहे. तिस-या आणि चवथ्या सत्राच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रकल्प दिले जातात. विभागाच्या प्राध्यापकांनी अनेक पेटंट्स दाखल केले असून त्यांना पुरस्कृत करण्यात आले आहे. विभागात उत्कृष्ट संशोधन सुविधा उपलब्ध असून संशोधन करणा-या विद्यार्थ्यांना फेलोशिप्स मिळाल्या आहेत. विभागाव्दारे विविध प्रकल्पांवर काम करणा-या पोस्ट डॉक्टरल फेलोंना पोस्ट डॉक्टरल संशोधनासाठी सुविधा पुरविल्या जातात.

आण्विक जीवशास्त्र, कम्प्यूटेशनल जीवशास्त्रात आवड असलेले अनेक विद्यार्थी ज्ञान-आधारित उद्योगांमध्ये यशस्वीरित्या कार्यरत आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी कृषी-बायोटेक क्षेत्रात प्रवेश केला असून, अंकुर सीड्स नागपूर, जय बायोटेक पुणे, ड्यु पॉंट इंडिया हैदराबाद, माहिको जालना तसेच सेरम इन्स्टिटयुट, लुपिन, सन फार्मा, बायोलॉजिकल ई, इनटस, बायोफार्मा या सारख्या व्हॅक्सीन व बायोफार्मा कंपन्यांमध्ये ते रुजू झाले आहेत. तर संशोधनाची आवड असलेले विद्यार्थी जगभरातील मोठमोठ्या संस्थांमध्ये आपले स्थान निर्माण करीत आहेत. एवढेच नव्हे, तर भारतातील अग्रगण्य संशोधन संस्था आय.आय.एस.सी., बंगळुरू, आय.आय.एस.ई.आर, पुणे, आय.आय.एस.ई.आर. भोपाळ, आय.आय.टी. दिल्ली, एन.सी.सी.एस., आगरकर इन्स्टिट्युट, पुणे, एन.डी.आर.आय. हिसार, आय.आय.टी. मंडी या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळिवला आहे.

प्रवेश पात्रता

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे आयोजित प्रवेश परीक्षेस बसण्यासाठी विज्ञान, जीवशास्त्र किंवा कृषी, पशू वैद्यकीय आणि मत्स्य विज्ञान, फार्मसी किंवा बॅचलर ऑफ मेडिसिन अँड बॅचलर ऑफ सर्जरी किंवा बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी किंवा समकक्ष परीक्षेत बॅचलर पदवीधर असलेले उमेदवार पात्र आहेत. प्रवेश क्षमता २० असून प्रवेश परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

# निष्ठावान कर्मचाऱ्यांमुळे विद्यापीठ गतिशील - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
## विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक निरोप

आपल्या मातृसंस्थेप्रती कर्मचाऱ्यांचे प्रेम, निष्ठा, यामुळेच विद्यापीठ गतिशील आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता तथा व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. डी.डब्ल्यू. निचित, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव श्री राहुल नरवाडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती सौ. सुनिता मंगरुळकर, श्री मंगरुळकर, श्री विठ्ठलराव मरापे, सौ. मरापे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठाच्या विकासामध्ये सर्व कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे. कर्मचारीच विद्यापीठाचे आधारस्तंभ आहेत, पुढेही असेच प्रेम, निष्ठा कायम राहील असे सांगून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांनी निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्यात. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री मंगरुळकर तसेच सौ. मंगरुळकर, श्री व्ही.के. मरापे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवप्रमाणपत्र देऊन, तर सौ. मंगरुळकर यांचा सौ. अनुपमा देशमुख, सौ. मरापे यांचा सौ. पुनम जाधव यांनी साडीचोळी, कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. डी. डब्ल्यू. निचित म्हणाले, विद्यापीठाचे कर्मचारी निष्ठेने काम करतात. कामाप्रती ते एकनिष्ठ आहेत, असे सांगून त्यांनी सत्कारमूर्तींना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सत्कारमूर्ती सौ. मंगरुळकर मनोगत व्यक्त करतांना म्हणाल्या, मातृसंस्थेतून निवृत्त होतांना मन हळवं होतं. मातृसंस्था, समाजाला आपलं काही देणं लागतं, त्याचं समाधानही आहे व सेवाकाळातील सुखद आठवणी कायम स्मरणात राहतील. श्री विठ्ठलराव मरापे म्हणाले, सेवाकाळात सहकारी कर्मचाऱ्यांचे भरभरुन प्रेम मिळाले. विद्यापीठ एक कुटुंबच आहे. विद्यापीठाचे ऋण कधीही फेडता येणार नाही. नियंत्रण अधिकारी डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव श्री राहुल नरवाडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्ती सौ. सुनिता मंगरुळकर तसेच श्री विठ्ठलराव मरापे यांना उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले, मानद सचिव श्री श्रीकांत तायडे, संचालक डॉ. नितीन कोळी यांनी सत्कारमूर्ती सौ. सुनिता मंगरुळकर व श्री विठ्ठलराव मरापे यांचा भागभांडवलाचा धनादेश व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक श्री धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणीचे सदस्य, विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.







सौ. सुनिता मंगरूळकर व श्री विठ्ठलराव मरापे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

# कर्मचा-यांनी सुवास देणारी बाग निर्माण केली - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
## विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांना सन्मानपूर्वक निरोप



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

विद्यापीठातून कर्मचारी सेवानिवृत्त होत असले तरी त्यांनी विद्यापीठ एक सुवास देणारी बाग निर्माण केली आणि आज ते सोडून जात आहेत, असे भावनिक प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी सहा. कुलसचिव श्री रविंद्र सयाम, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री एस.बी. तेल्हारकर, श्री एस.एल. चुंबडे, सौ. चुंबडे, श्री पी.बी. उबाळे, सौ. उबाळे, श्री व्ही.एस.मुंजाळे, सौ. मुंजाळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, खरे तर पडद्यामागील हात सातत्याने राबत होते, त्यामुळेच विद्यापीठ वेगाने प्रगतीच्या पथावर गेले आणि देशभरात आपल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नावलौकीक झाला. गुणवत्तापूर्ण कर्मचा-यांमुळे विद्यापीठाला यश प्राप्त करता आले, असे सांगून सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांनी निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्यात. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री एस.बी.तेल्हारकर, श्री एस.एल. चुंबडे, श्री पी.बी. उबाळे, श्री व्ही.एस. मुंजाळे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन, तर सौ. चुंबडे, सौ. उबाळे, सौ. मुंजाळे यांचा सौ. धमाळे यांनी साडीचोळी, कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला.

प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, सत्कारमूर्ती चुंबडे यांनी विद्यापीठाला उत्कृष्ट सेवा दिली आहे. त्यांनी आता सहकुटुंब भारतभ्रमण करुन आपल्या कुटुंबियांचाही उत्साह वाढवावा. तेल्हारकर यांचेही निटनेटके काम राहिले आहे. पर्यावरण संवर्धनात श्री उबाळे यांनी मोठी भूमिका पार पाडली आहे. त्यामुळे श्री उबाळे यांचे नाव स्मरणात राहील. श्री मुंजाळे यांचीही सेवा उत्कृष्ट राहिली आहे, असे सांगून त्यांनी चारही सत्कारमूर्तींना पुढील आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी सत्कारमूर्ती श्री एस.बी.तेल्हारकर, श्री एस.एल. चुंबडे, श्री पी.बी. उबाळे, श्री व्ही.एस. मुंजाळे यांनी आपल्या सेवा काळातील अनुभव सांगतांना सहकारी कर्मचा-यांकडून मिळालेल्या प्रेम, स्नेहभाव व सहकार्यामुळे सर्वांचे आभार व्यक्त केले. तर नियंत्रण अधिकारी श्री रवींद्र सयाम, श्री शशिकांत रोडे, तसेच विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनीही मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्यात.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले, मानद सचिव श्री श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्ती श्री एस.बी. तेल्हारकर, श्री एस.एल. चुंबडे, श्री पी.बी. उबाळे, श्री व्ही.एस. मुंजाळे यांचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक श्री धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला



प्रमुख अतिथी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे मार्गदर्शन करतांना

विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणीचे सदस्य, विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

सत्कारमुर्तींचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री. एस.बी. तेल्हारकर



श्री. व्ही.एस. मुंजाळे



श्री. सुखदेव चुंबळे



श्री. पी.बी. उबाळे

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात स्व.डॉ. श्रीकांत जिचकार पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न

स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्रात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. पुण्यतिथी कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ. संदीप वाघुळे, केंद्राचे संचालक डॉ. संदीप जोशी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, आय.आय.एम.सी. चे संचालक डॉ. राजेश कुशवाह, डॉ. विनय सोनुले तसेच विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते.



पुण्यतिथी कार्यक्रमाला उपस्थित विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी

# विद्यापीठात छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी

छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्रा.डॉ. प्रशांत ठाकरे, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव श्री रविंद्र सयाम, श्री विलास काकडे तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.




# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी




पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव श्री अनिल मेश्राम, डॉ. दुर्गे तसेच विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते. संचालन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

दैनिक दिव्य मराठी

**उपक्रम** • पर्यावरण दिनानिमित्त संत गाडगेबाबा विद्यापीठामध्ये कुलगुरूंच्या हस्ते प्रारंभ

# संत गाडगेबाबा विद्यापीठाद्वारे एक हजार वृक्षारोपण मोहिमेला सुरुवात

प्रतिनिधी । अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यावर्षी पावसाळी हंगामात विद्यापीठ परिसरात एक हजारापेक्षा जास्त नवीन वृक्षांचे रोपण करणार आहे. विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर ४५० एकरमध्ये पसरलेला असून, सध्या येथे ४.५ लाखांहून अधिक वृक्ष डौलदारपणे उभे आहेत. ते बघता अमरावती शहराच्या पर्यावरण संवर्धनात विद्यापीठाचे मोठे योगदान मिळत आहे. पर्यावरण संवर्धनासाठी विद्यापीठाला यापूर्वी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पाच नामांकित पुरस्कार प्राप्त झाले आहेत, असेही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यावेळी नमूद केले.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात गुरुवार ५ जून रोजी वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. विद्यापीठाच्या परीक्षा विभागासमोर कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. नितीन कोळी, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, उद्यान अधीक्षक अनिल घोम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपापल्या परिसरात वृक्षारोपण करावे व पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात मोलाचे योगदान द्यावे,. असे आवाहनही कुलगुरूंनी याप्रसंगी केले.

**विद्यापीठ परिसर शहराचा 'ऑक्सिजन पार्क'** : विद्यापीठाच्या ४५० एकर परिसराचे ' शहराचा ऑक्सिजन पार्क' असेही वर्णन या वेळी केले. या परिसरात ४ लाख ५० हजारांपेक्षा अधिक विविध जाती-प्रजातींची झाडे आहेत. याव्यतिरिक्त दोन मोठे जलाशय आणि अनेक बंधारे असल्यामुळे जमिनीत मोठ्या प्रमाणात पाणी मुरते, ज्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी प्रचंड वाढली आहे. विविध पशुपक्षी आणि वृक्षांनी नटलेला हा परिसर निसर्ग सौंदर्यात भर घालत असून, विद्यापीठाचा परिसर पर्यावरण संवर्धनाचा एक मानबिंदू ठरला आहे. वृक्षारोपण करण्याकरीता खड्डे खोदणे व वृक्षारोपणासंदर्भात सर्व कामे करण्याकरीता उद्यान विभागातील कर्मचारी व मजूरांनी अथक परिश्रम घेतलेत.यावेळी विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.



विद्यापीठात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## विद्यापीठातील हिरवळीमुळे शहराच्या सौंदर्यातही पडली भर

कोणतेही शहर जेवढे हिरवे तेवढेच ते सुंदर दिसते. विद्यापीठ परिसरातील भरगच्च हिरवळ, वृक्ष, वेलींमुळे या परिसरात फिरताना अगदी मोकळा श्वास मनुष्य घेत असतो. त्यामुळेच येथे सकाळी व सायंकाळी फिरायला येणाऱ्यांचीही गर्दी असते. अनेकांचे फिरायला जाण्यासाठी हमखास हक्काचे ठिकाण म्हणजे अमरावती विद्यापीठाचा परिसर असे ठरले आहे. येथील रस्त्यांवर अभावानेच सूर्यप्रकाश पडतो, यावरून येथील वृक्षराजी किती घनदाट आहे, याचा प्रत्यय येईल. विद्यापीठातील हिरवळीने शहराच्या सौंदर्यातही निश्चितपणे भर घातली आहे. कारण, येथील विविध प्रजातींचे डेरेदार वृक्ष बघितल्यानंतर मनाला अलौकिक शांती मिळते. मनच नव्हे तर डोळेही हिरवळ बघून शांत होतात.

The Hitavada

# SGBAU saving money, environment through its SOLAR PUSH

■ Amravati Bureau

AMRAVATI, June 13

SANT Gadgebaba Amravati University, in collaboration with Solar Energy Corporation of India (SECI), a Central Government agency based in New Delhi, had established a 576-kilowatt solar power project in 2018. Dr Milind Barhate, Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University, through a press release, informed that the University's efforts in the field of solar energy and energy conservation are exemplary and guiding.

"Currently, 55 percent to 60 percent of the University's total electricity consumption needs are met through this solar project. The electricity generated through solar energy is priced at Rs 3.62 per unit, whereas the distribution company's rate is Rs 11.52 per unit. This significant difference has led to a financial saving of around Rs 3 crore over the past six years," it was informed. Additionally, the project has also contributed to environmental conservation by preventing the emission of approximately 4,081 tonnes of carbon dioxide.

Over the past six years, the University has increased the use of BLDC ceiling fans, LED tube lights and street lights, and five-star-rated appliances, resulting in substantial energy savings. Despite a significant increase in the number of buildings, equipment, and events, the university's electricity consumption has decreased from 14.64 lakh units to 13.57 lakh units in the year 2024-25, which is noteworthy, the press release stated.

"Currently, 81 percent of the lighting on campus consists of LED lights, and 50 percent of ceiling fans are energy-efficient BLDC fans. The University has submitted proposals to financial institutions to secure funds to achieve 100 percent implementation and is also pursuing support under Corporate Social Responsibility (CSR) funding. So far, Maharashtra Energy Development Agency (Mahaurja) has provided financial assistance of Rs 44 lakh in two phases for installing energy-saving LED lights, BLDC ceiling fans, and five-star-rated air conditioning units. The University has also installed solar water heaters with a total capacity of 20,000 litres on residential buildings to further promote solar energy usage. Based on an energy audit report, the University plans to enhance the capacity of the solar power project and work more effectively in the fields of energy saving and conservation.

Dr Milind Barhate has appealed to all departments to actively save electricity and avoid wastage. The University's solar power project and electrical substation are considered model projects, frequently visited by trainee engineers from power distribution companies, as well as representatives from other universities and dignitaries, who study the project and praise the University's initiatives.

Under the leadership of Dr Milind Barhate, Dr Mahendra Dhore, Pro Vice-Chancellor and Dr Avinash Asnare, Registrar and the guidance of various authorities, the University's efforts have been successfully implemented by Shashikant Rode, Executive Engineer, Rajesh Yedle, Akash Solanke, Junior Engineer and all staff members of the Engineering Department.



Solar plant installed at the SGBA University.

# नवराष्ट्र

अभिवादन • डॉ. चौधरी यांचे प्रतिपादन; विद्यापीठात शिवरायांचा राज्याभिषेक दिन सोहळा

## शिवराज्याभिषेक म्हणजे स्वातंत्र्य पहाट

**अमरावती, ब्युरो.** 'आपण कोणाचे गुलाम नाही, आपले स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे. त्या राज्याला स्वतःचे धोरण असावे आणि रयतेच्या मनात स्वराज्याची संकल्पना बिंबावी', या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केला. हा सोहळा म्हणजे स्वातंत्र्याच्या सूर्याचे दर्शनच होते, असे मत छत्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालयाचे प्राचार्य आणि शिवव्याख्याते डॉ. दिलीप चौधरी यांनी व्यक्त केले. विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती सभागृहात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त 'शिवराज्याभिषेक – एक क्रांतिकारक घटना' या विषयावर आयोजित व्याख्यानात डॉ. चौधरी बोलत होते. अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष मनोहर कडू, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे आणि विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. चौधरी पुढे म्हणाले, 'शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक केवळ राजसत्तेची घोषणा नव्हे; तर संपूर्ण प्रांतावर स्वायत्तता व सार्वभौमत्व रुजविण्याचा निर्णायक टप्पा होता. अठरापगड जातींच्या लोकांना एकत्र करून त्यांच्या मनात स्वराज्य रुजविणे हा त्यामागचा मुख्य हेतू होता.' त्यांनी पुढे सांगितले की, 'महाराजांनी मुघलांशी लढताना सर्व जाती-धर्मांतील, विशेषतः मुस्लिम बांधवांनाही आपल्या सैन्यात स्थान दिले. त्यामुळे त्यांच्या राज्यातील सर्वधर्मसमभाव दिसून येतो. परकीय सत्तांनी महाराजांना 'राजा' म्हणून मान्यता दिली नव्हती. त्यामुळे परकीय व्यापार्यांशी सरळ व्यवहार होण्यासाठी आणि राज्याचा विकास साधण्यासाठी राज्याभिषेक अनिवार्य होता,' असे ते म्हणाले.



### शिवचरित्र वाचनाची आज गरज

विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांनी सांगितले, 'शिवचरित्र वाचून त्यातील उत्तरदायित्वाची भावना आत्मसात करण्याची आज गरज आहे. शिवराज्याभिषेक ही रयतेमध्ये राष्ट्रप्रेम निर्माण करणारी घटना होती.' कार्यक्रमात शिवराज्याभिषेक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

### शिवराज्याभिषेक म्हणजे आत्मविश्वासाचा निर्धार

'राजमाता जिजाऊंनी 32 मण सोन्याचे सिंहासन बनवून दिले. त्यामुळे शत्रूंमध्ये भीती आणि जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. महाराजांचे युद्धतंत्र, प्रशासन व राजकारण विलक्षण होते. राज्याभिषेकातून सामान्य माणसालाही राज्य आपले वाटले, हीच खरी शिवराज्याभिषेकाची फलश्रुती', असे डॉ. चौधरी म्हणाले.

### शिवराज्याभिषेक, परकीय सत्तेविरुद्धचा निर्धार : डॉ. गुडधे

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. वैशाली गुडधे म्हणाल्या, 'विद्यापीठात महाराजांचे राजकारण, युद्धनीती व प्रशासकीय मूल्यांचा अभ्यासक्रमात समावेश आहे. विद्यार्थ्यांनी महाराजांचा विचार आचरणात आणून राष्ट्रनिर्मितीसाठी काम करावे.'

### विद्यापीठाचा सातत्यपूर्ण उपक्रम : डॉ. असनारे

कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, 'विद्यापीठात महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांनी महाराजांच्या विचारांचा अभ्यास करून स्वराज्यनिर्मितीत योगदान द्यावे.'

# मंगल प्रहर



## मॉडेल कॉलेज की छात्रा का टीसीएस कंपनी में चयन

### कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते ने दी शुभकामनाएं

**अमरावती। मंगल प्रहर ब्यूरो**

संभाग के बुलढाणा स्थित मॉडेल डिग्री कॉलेज में पढनेवाली छात्रा का टाटा कन्सल्टंसी सर्विसेस नामक कंपनी में चयन हुआ। जिसके चलते कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते ने छात्रा को सम्मानित किया। संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय शेगांव व्दारा कैम्पस् ड्राइव लिया गया था। जिसमें चयन हुई दो छात्राओ का कुलगुरु ने सम्मान किया।

प्रियंका वैष्णव व वैष्णवी पवार का कंपनी में चयन हुआ। जिसके चलते विवि व्दारा छात्राओ को शुभकामनाएं दी गई। इस अवसर पर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मानव विज्ञान विद्या शाखा की डीन डॉ. मोना चिमोटे, उपकुलसचिव मंगेश वरखडे, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे, महाविद्यालय के मानद संचालक डॉ. अन्नासाहब म्हळसणे और डॉ. के.वाय. वाघ उपस्थित थे।

दैनिक दिव्य मराठी

संवाद • विचारशलाका महानुभाव तत्वज्ञान विशेषांकाचे कुलगुरूंच्या हस्ते प्रकाशन

# विचारशलाकाचे वैचारिक साहित्यात मौलिक योगदान : कुलगुरू बारहाते

प्रतिनिधी | अमरावती

विचारशलाका या त्रैमासिकाचे महाराष्ट्रातील वैचारिक साहित्यामध्ये मौलिक योगदान असल्याचे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी डॉ. नागोराव कुंभार संपादित विचार शलाकाच्या महानुभाव तत्वज्ञान विशेषांकाचे विमोचन करताना केले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संपादक डॉ. नागोराव कुंभार, अतिथी संपादक डॉ. संतोष ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.



विचारशलाका महानुभाव तत्वज्ञान विशेषांकाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

कुलगुरू पुढे म्हणाले, विचारशलाका महानुभाव तत्वज्ञानावर आधारित अंकाचे विमोचन माझ्या हस्ते व्हावे, अशी अपेक्षा संपादक डॉ. कुंभार यांनी व्यक्त केली, त्यास मी होकार दिला. आज मला खूप आनंद होत आहे की, माझ्या हस्ते या अंकाचे विमोचन याठिकाणी झालेले आहे. मराठीतील पहिला ग्रंथ लीळाचरित्र हा अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर याठिकाणी लिहिल्या गेला. आपल्या मातृभाषेतील पहिला ग्रंथ असल्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. समाज विकासासाठी श्री चक्रधर स्वामींनी दिलेले तत्वज्ञान खूप महत्वाचे असून त्याचा अभ्यास सर्वांनी करावा, असे सांगून संपादक डॉ. नागोराव कुंभार, डॉ. संतोष ठाकरे व संपादक मंडळाचे त्यांनी अभिनंदन केले. डॉ. कुंभार यांच्या हातून असेच कार्य भविष्यातही घडत राहो, अशा शुभेच्छाही कुलगुरूंनी याप्रसंगी दिल्यात. विचार शलाकाच्या ५०० पृष्ठाच्या या विशेषांकात ४७ लेखांचा समावेश आहे. यामध्ये महानुभाव तत्त्वज्ञानाच्या विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकणाऱ्या डॉ. जनार्दन वाघमारे, यशवंत मनोहर, आ. ह. साळुंखे, इंद्रजित भालेराव, डॉ. संतोष ठाकरे, डॉ. श्रीधर आकाशकर, डॉ. युवराज शास्त्री, प्रा. दीपक तायडे, मा. रा. लामखडे, सतीश बडवे, नरेंद्र लांजेकर, रणधीर शिंदे आदी मान्यवर, विचारवंत, साहित्यिक आणि संशोधकांच्या लेखांचा समावेश आहे. वाचकांना महानुभाव तत्वज्ञान समग्ररित्या समजून घेण्यासाठी या विशेषांकाचा निश्चितच लाभ होणार आहे. विचारशलाकाने यापूर्वी चार्वाक तत्वज्ञान, बौद्ध तत्वज्ञान, जैन तत्वज्ञान, महात्मा बसवेश्वरांचे तत्वज्ञान असे महत्वपूर्ण विशेषांक काढून विचारविश्व समृद्ध केले आहे. या वेळी डॉ. नागोराव कुंभार यांनी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला आहे.

प्रास्ताविक महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर यांनी केले. सूत्रसंचालन करून आभार डॉ. संदीप जुनघरे यांनी मानले. या वेळी डॉ. अण्णा वैद्य, डॉ. वानखेडे, संदीप जुनघरे, प्रा. सीमा मेटकर, अनंत तेलखडे, गोवर्धन तेलखडे, प्रतिभा भुगूल, सतीश मानकर, रजनी घोरमाडे, डॉ. मेहरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## महानुभाव तत्वज्ञानामुळे महिलांना सन्मान मिळाला

डॉ. संतोष ठाकरे म्हणाले, की लीळाचरित्रात समाज जीवन आहे, निसर्ग आहे, भौगोलिक वर्णन सुद्धा अतिशय सुंदर रितीने केले आहे. ८०० वर्षांपूर्वी महिलांना सन्मान महानुभाव तत्वज्ञानामुळे मिळाला. त्याकाळी महिलांना कुठलेच अधिकार नव्हते, ते अधिकार त्यावेळी महिलांना दिल्या गेले. महिलांकडून दीक्षा सुद्धा दिल्या गेली.

मराठी दैनिक वृत्त केसरी
नवा संकल्प नवी दृष्टी

### सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ

# निष्ठावान कर्मचाऱ्यांमुळे विद्यापीठ गतीशील

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी / वृत्त केसरी

अमरावती, ३ जून: आपल्या मातृसंस्थेप्रती कर्मचा-यांचे प्रेम, निष्ठा, यामुळेच विद्यापीठ गतिशील आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.




प्रमुख अतिथी म्हणून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता तथा व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.डी.डब्ल्यू. निचित, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, उपकुलसचिव राहुल नरवाडे, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, सत्कारमूर्ती सुनिता मंगरुळकर, मंगरुळकर, विठ्ठलराव मरापे, सौ. मरापे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी मंगरुळकर तसेच व्ही.के. मरापे यांचा तर मंगरुळकर यांचा अनुपमा देशमुख, मरापे यांचा पुनम जाधव यांनी सत्कार केला. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने उपाध्यक्ष डॉ.अविनाश असनारे, कोषाध्यक्ष राजेश एडले, मानद सचिव श्रीकांत तायडे, संचालक डॉ. नितीन कोळी यांनी सत्कारमूर्ती सुनिता मंगरुळकर व विठ्ठलराव मरापे यांचा भागभांडवलाचा धनादेश व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तर आभार अधीक्षक धनंजय पाटील यांनी मानले.

हिंदुस्थान

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी




अमरावती दि. १ : पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव श्री अनिल मेश्राम, डॉ. दुर्गे तसेच विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते. संचालन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

विदर्भ का प्रमुख हिंदी अखबार, दैनिक
अमरावती मंडल

# आंतर विद्यापीठ बेसबॉल स्पर्धा के लिए खिलाडियों का चयन

## राजस्थान में होने वाली स्पर्धा के लिए कुलगुरू डॉ. बारहाते ने दी शुभकामना

**प्रतिनिधि/दि.३**

**अमरावती** – श्री जगदीश प्रसाद झावरमल टिबरेवाला युनिव्हर्सिटी राजस्थान में १४ से १७ जून के दौरान होने वाली अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल (पुरुष व महिला) स्पर्धा के लिए संगाबा अमरावती विद्यापीठ पुरुष तथा महिला टीम की घोषणा कि गई है. पुरुष टीम में शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला के पवन अवतिरक, वैभव पाठक, रूपेश बाकडे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती के अभिषक स्वर्गे, विशाल कांबे, अमलोकचंद महाविद्यालय यवतमाल के दिपक गजभिये, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय भातकुली के स्वप्निल कुरवाडे, अंकुश नांदणे, साक्षात ढेंगेकर, भारतीय महाविद्यालय अमरावती के आकाश सोलंके, अमोल सैरीसे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती के अथर खान, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती के साहिल तायडे, जनता कला व वाणिज्य महाविद्यालय मलाकापुर के करण सिंह राजपूत, रामकृष्ण महाविद्यालय दारापुर के अक्षद गवई, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती के यश नंन्नावरे का समावेश हे.




उसी प्रकार महिला टीम में महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय भातकुली की अंकिता हिवरकर, गौरी खेतखेडे, समृध्दी लोरे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्यूकेशन अमरावती की राधिका सिकची, साक्षी भारस्कार, श्री शिवाजी महाविद्यालय अमरावती की तेजस्वीनी गुल्हाने, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला की प्राची कुचर ,भारतीय महाविद्यालय अमरावती की दिपाली ढोले, श्रीमती एन आर्टस , कॉमर्स एन्ड सायंन्स कॉलेज अमरावती की साक्षी चाफलकर, श्रीमती सालुकाबाई राउत महाविद्यालय वनोजा की नेहा बुंदेले, श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय अंजनगांव सुर्जी की शिवानी वरखडे, जनता कला व वाणिज्य महाविद्यालय मलकापुर की नंदिनी दिक्षीत व श्रृती मांडवाले, रामकृष्ण महाविद्यालय दारापुर की सलोनी साहू, सरस्वती कला महाविद्यालय दहीहांडा की रिया डोंगरे, श्रीमती वत्सला बाई नाईक महिला महाविद्यालय पुसद की हर्षदा बिहाडे का चयन किया गया सभी चयनीत खिलाडीयों का कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र.-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोले, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे ने अभिनंदन कर शुभकामनाएं दि.

जनमाध्यम

# छत्रपतींनी स्वातंत्र्याचा सूर्य दाखविला-डॉ.चौधरी

**अमरावती/का.प्र**

आपण कोणाचे गुलाम नाही.आपले स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे, त्या राज्याला स्वत:चे धोरण असावे. स्वराज्याची संकल्पना लोकांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करुन रयतेला स्वातंत्र्याचा सूर्य दाखविला, असे प्रतिपादन छत्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालयाचे प्राचार्य शिवव्याख्याते डॉ. दिलीप चौधरी यांनी केले. विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती सभागृहात



## विद्यापीठात शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा साजरा

आयोजित छत्रपती शिवरायांचा ३५२ वा राज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त 'शिवराज्याभिषेक एक क्रांतिकारक घटना' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष मनोहर कडू, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे व विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख उपस्थित होते. याप्रसंगी गुणवत्ता यादीत स्थान मिळविल्याबद्दल सोनाली कान्हेरकर यांचा सन्मानचिन्ह देवून मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. शिवगर्जना प्रा. आदित्य पुंड यांनी, तर शंखनाद दिपक अडसड यांनी केला. प्रास्ताविकतेतून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी शिवराज्याभिषेक दिनाचे महत्व विषद केले व कार्यक्रम आयोजनामागील भूमिका मांडली. संचालन प्रा. आश्विनी राऊत यांनी, तर आभार प्रा. राम ओलीवकर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

सच आपला
**मातृभूमि**

# मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थिनींची टी.सी.एस.कंपनीमध्ये निवड

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते विद्यार्थिनींचा सत्कार

प्रतिनिधी/१८ जून

**अमरावती–** येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये वाणिज्य विभागात शिकत असलेल्या आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हसेस (टी.सी.एस.) या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या माहिती तंत्रज्ञान कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ नुकताच महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहात पार पडला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगावच्या कॅम्पस मुलाखतीतून (कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह) टी.सी.एस.मध्ये निवड झालेल्या दोन विद्यार्थिनींचा यावेळी सन्मान करण्यात आला. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी कु. प्रियंका



वैष्णव व कु. वैष्णवी पवार यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आजच्या स्पर्धात्मक युगात कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाने यश नक्कीच मिळते, हे या विद्यार्थीनींनी सिद्ध केले आहे. मॉडेल डिग्री महाविद्यालयाने नेहमीच विद्याश्र्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांना व्यावसायिक जगासाठी तयार करण्यावर भर दिला आहे. आजचे हे यश त्याचेच फलित आहे, असे उद्गार याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. यावेळी टीसीएसमध्ये निवड झालेल्या विद्यार्थीनींनी सुध्दा आपले अनुभव कथन केले. महाविद्यालयातील शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन आणि प्लेसमेंट सेलने केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिष्ठता डॉ. मोना चिमोटे, श्री. मंगेश वरखडे, श्री शशिकांत रोडे, महाविद्यालयाचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे, डॉ. कि.वा..वाघ उपस्थित होते.

**विदर्भ मतदार**

# जलतरणपटू कौस्तुभ गाडगे याची उत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड

## कुलगुरू डॉ मिलिंद बारहाते यांच्या हस्ते सत्कार



**नमस्कार अमरावती**

**अमरावती (प्रतिनिधी) दि. २९ :** स्थानिक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी जलतरणपटू कौस्तुभ चंद्रकांत गाडगे याची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा सत्र २०२४-२५ चा उत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाली असून त्याचा विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कौस्तुभ गाडगे याने केरळ येथे झालेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत कांस्यपदक तर उत्तराखंड येथे झालेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत रौप्यपदक पटकावले होते. त्याच्या या कामगिरीबद्धल महाराष्ट्र शासनाने त्याला रोख रक्कम रुपये ७ लक्ष देऊन सन्मानित केले होते. कौस्तुभच्या या कामगिरीमुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने उत्कृष्ट खेळाडू घोषित करून त्याचा सत्कार केला. सत्कार सोहळ्याला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, श्री.शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण व रंजन मंडळाचे आणि विधीसभेचे सदस्य डॉ.सुभाष गावंडे, विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण संचालक डॉ.तनुजा राऊत, डॉ.विकास ढोणे प्रामुख्याने उपस्थित होते. कौस्तुभ गाडगे याच्या या यशाबद्धल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, सचिव डॉ.वि.गो.ठाकरे आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच कौस्तुभचे प्रशिक्षक योगेश निर्मळ, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या क्रीडा समितीचे सदस्य डॉ.नितीन चांगोले, डॉ.कुमार बोबडे, डॉ.उमेश कडू, डॉ.किशोर साबळे व सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**जनमाध्यम**

# 'विचारशलाका'चे वैचारिक साहित्यामध्ये मौलिक योगदान : कुलगुरू

## 'विचारशलाका' महानुभाव तत्वज्ञान विशेष अंकाचे विमोचन

अमरावती/का.प्र.

विचारशलाका या त्रैमासिकाचे महाराष्ट्रातील वैचारिक साहित्यामध्ये मौलिक योगदान असल्याचे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी डॉ. नागोराव कुंभार संपादित विचारशलाकाच्या महानुभाव तत्वज्ञान विशेषांकाचे विमोचन करतांना केले.यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संपादक डॉ. नागोराव कुंभार, अतिथी संपादक डॉ. संतोष ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.



मराठीतील पहिला ग्रंथ लीळाचरित्र हा अमरावती जिल्हातील रिद्धपूर याठिकाणी लिहिल्या गेला. आपल्या मातृभाषेतील पहिला ग्रंथ असल्याचा आम्हां सर्वांना अभिमान आहे. समाज विकासासाठी श्री चक्रधर स्वामींनी दिलेले तत्वज्ञान खूप महत्वाचे असून त्याचा अभ्यास सर्वांनी करावा, असे सांगून संपादक डॉ. नागोराव कुंभार, अतिथी संपादक डॉ. संतोष ठाकरे व संपादक मंडळाचे त्यांनी अभिनंदन केले.

डॉ. कुंभार यांच्या हातून असेच कार्य भविष्यातही घडत राहो, अशा शुभेच्छा सुद्धा कुलगुरूंनी याप्रसंगी दिल्यात. विचारशलाकाच्या ५०० पृष्ठाच्या या विशेषांकामध्ये ४७ लेखांचा समावेश आहे. यामध्ये महानुभाव तत्वज्ञानाच्या विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकणाया डॉ. जनार्दन वाघमारे, यशवंत मनोहर, आ.ह. साळुंखे, इंद्रजित भालेराव, डॉ. संतोष ठाकरे, डॉ. श्रीधर आकाशकर, डॉ. युवराज शास्त्री, प्रा. दिपक तायडे, मा.रा. लामखडे, सतीश बडवे, नरेंद्र लांजेकर, रणधीर शिंदे आदी मान्यवर, विचारवंत, साहित्यीक आणि संशोधकांच्या लेखांचा समावेश आहे. वाचकांना महानुभाव तत्वज्ञान समग्ररित्या समजून घेण्यासाठी या विशेषांकाचा निश्चितच लाभ होणार आहे. विचारशलाकाने यापूर्वी चार्वाक तत्वज्ञान, बौद्ध तत्वज्ञान, जैन तत्वज्ञान, महात्मा बसवे=रांचे तत्वज्ञान असे महत्वपूर्ण विशेषांक काढून विचारविश्व समृद्ध केले आहे.

याप्रसंगी डॉ. नागोराव कुंभार यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे यांचा शाल, श्रीफळ देवून सत्कार केला.प्रास्ताविक महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर यांनी केले.संचालन व आभार डॉ. संदीप जुनघरे यांनी मानले.

यावेळी डॉ. अण्णा वैद्य, डॉ. वानखेडे, डॉ. संदीप जुनघरे, प्रा. सिमा मेटकरे, अनंत तेलखडे, श्री गोवर्धन तेलखडे, प्रतिभा भूगूल, सतिश मानकर, रजनी घोरमाडे, डॉ. मेहरे, कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक रमेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विद्यापीठात वृक्षारोपण



**लोकशाही वार्ता/अमरावती**

जागतिक पर्यावरण दिना औचित्य साधून संत गाडगे बाब अमरावती विद्यापीठात आज (गुरूवार ५ जून ) वृक्षारोप कार्यक्रम पार पडला. विद्यापीठाच्य परीक्षा विभागासमोर कुलगुरू डॉ मिलींद बारहाते यांच्या हस्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. नितीन कोळी आजीवन अध्ययन व विस्ता विभाग संचालक डॉ. श्रीकां पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, उद्यान अधीक्षक अनिल घोम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**नवराष्ट्र**

# कुलगुरूंच्या हस्ते विद्यार्थीनींचा सत्कार



**अमरावती, ब्युरो.** बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये वाणिज्य विभागात शिकत असलेल्या आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या माहिती तंत्रज्ञान कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ नुकताच सभागृहात उत्साहात पार पडला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला.

शेगावच्या संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस मुलाखतीतून (कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह) टी.सी.एस.मध्ये निवड झालेल्या दोन विद्यार्थिनींचा यावेळी सन्मान करण्यात आला. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी प्रियंका वैष्णव व वैष्णवी पवार यांचे कौतुक केले आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आजच्या स्पर्धात्मक युगात कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाने यश नक्कीच मिळते, हे या विद्यार्थीनींनी सिद्ध केले आहे. मॉडेल डिग्री महाविद्यालयाने नेहमीच विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांना व्यावसायिक जगासाठी तयार करण्यावर भर दिला आहे. आजचे हे यश त्याचेच फलित आहे, असे उद्गार याप्रसंगी कुलगुरू डॉ. बारहाते यांनी काढले. यावेळी टीसीएसमध्ये निवड झालेल्या विद्यार्थीनींनी सुध्दा आपले अनुभव कथन केले. महाविद्यालयातील शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन आणि प्लेसमेंट सेलने केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिष्ठता डॉ. मोना चिमोटे, श्री. मंगेश वरखडे, श्री शशिकांत रोडे, महाविद्यालयाचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे, डॉ. कि.वा. वाघ उपस्थित होते.

# विवि में मनाई अहिल्यादेवी होलकर की जयंती



**प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार**

**अमरावती, 31 मई - संगाबा** अमरावती विवि में पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर की जयंती मनाई गयी. इस समय कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते ने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर की प्रतिमा का पूजन व माल्यार्पण कर विवि की ओर से अभिवादन किया. जयंती कार्यक्रम में कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, डॉ.अजय लाड, डॉ.श्रीकांत पाटिल, डॉ.राजीव बोरकर, उपकुलसचिव डॉ.सुलभा पाटिल, डॉ.दादाराव चव्हाण, सहा.कुलसचिव अनिल मेश्राम, डॉ. दुर्गे व विवि के अधिकारी, कर्मचारी उपस्थित थे. कार्यक्रम का संचालन तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर के बारे में जानकारी डॉ. विलास नांदुरकर ने दी.

## अमरावती इव्हिनिंग

# विद्यापीठातर्फे विविध क्रीडा स्पर्धेत प्राविण्यप्राप्त चमूतील खेळाडू, व्यवस्थापक व प्रशिक्षक यांचा सत्कार



### खेळाडूंनी वाढविला विद्यापीठाचा नावलौकिक – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

अमरावती दि. २७ :– विद्यापीठाच्या खेळाडूंनी दक्षिण–पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करुन विद्यापीठाला विविध पदके व पारितोषिके प्राप्त करुन दिली आहेत. या सर्व खेळाडूंनी विद्यापीठाच्या विद्यापीठाचा नावलौकिक देशपातळीवर पोहचविला असून त्यात गौरवास्पद भर घातली आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने २०२४–२५ मधील दक्षिण–पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये प्राविण्यप्राप्त चमूतील खेळाडूंना रोख पुरस्कार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून तसेच चमू व्यवस्थापक आणि प्रशिक्षक यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. सुभाष गावंडे, डॉ. विकास टोणे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तनुजा राऊत उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, पदक मिळविणे सोपे नाही. पारंपारिक विद्यापीठांसह खाजगी विद्यापीठातील खेळाडू सुद्धा या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. खाजगी विद्यापीठे अद्ययावत सुविधा खेळाडूंना पुरवितात, त्या तुलनेत आपल्या खेळाडूंना कमी सुविधा असतात. तरी विद्यापीठाच्यावतीने खेळाडूंसाठी विविध सोयी–सवलतीमध्ये विद्यापीठाने वाढ केली आहे. रेल्वेतून ए.सी. कोचमध्ये प्रवासाची सुविधा विद्यापीठाने उपलब्ध करुन दिली असून भत्त्यामध्ये सुद्धा वाढ केली आहे.

शारीरिक शिक्षकांची संख्या सेवानिवृत्तीमुळे कमी होत असली, तरी ज्या शिक्षकांकडे प्रभार दिल्या जातो, ते अधिक जबाबदारीने काम करतील. नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले असून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरीता सर्व समस्यां व अडचणींवर शिक्षकांनी मात करावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. ए.आय. चा सुद्धा क्रीडा क्षेत्रात वापर वाढवावा. आयोजित कार्यशाळेतून अद्ययावत ज्ञान व क्रीडा कौशल्ये शिक्षकांनी प्राप्त करुन आपल्या खेळाडूंपर्यंत पोहचवावी, अशी अपेक्षा व्यक्त करुन विद्यापीठात सिन्थेटिक ट्रॅक व बहुउद्देशीय क्रीडा इमारत निर्माण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू पुढे म्हणाले, सर्व खेळाडू, चमू व्यवस्थापक व प्रशिक्षकांनी अतिशय मेहनत घेतल्यामुळे अनेक पारितोषिके प्राप्त करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात राष्ट्रीय स्तरावर भर घातली आहे. त्या सर्वांचे त्यांनी विद्यापीठाच्यावतीने अभिनंदन केले. भविष्यात आमचे खेळाडू आणखी पदके व पारितोषिके प्राप्त करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, देश पातळीवर दैदिप्यमान यश सर्व उत्कृष्ट खेळाडूंनी मिळविले आहे. कार्यशाळेच्या माध्यमातून सर्व क्रीडा विषयावर तज्ज्ञ विचार मांडतील, त्यावर साधक–बाधक चर्चा होवून त्याचा उपयोग क्रीडा शिक्षणाचा विकास होण्याकरीता निश्चितच होईल. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी क्रीडा स्पर्धेच्या आयोजनामध्ये क्रीडा प्रशिक्षक व व्यवस्थापक अथक परिश्रम घेतात. कुलगुरू सुद्धा आपणा सर्वांच्या पाठीशी आहेत. अनेक सुविधा व संधी खेळाडूंना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, त्यामुळे भविष्यात आमचे खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाच्या नावलौकिकात आणखी भर घालतील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांचे हस्ते कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम व कार्यशाळा आयोजनामागील भूमिका क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी मांडली. संचालन डॉ. रुपाली टोणे व श्री संतोष वानखडे यांनी, तर आभार डॉ. चिंचमलातपुरे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे तसेच शारीरिक शिक्षण मंडळाचे पदाधिकारी, पाचही जिल्हांतील क्रीडा संचालक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### कार्यशाळा

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगांव पेठचे डॉ. श्रीकांत माहुलकर व नाशिकचे डॉ. राजेश क्षत्रिय यांनी, दुसऱ्या सत्रात श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या डॉ. कविता वाटाणे व यवतमाळचे डॉ. अनुप कोठारी, तिसऱ्या सत्रात सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडाचे डॉ. सागर नारखेडे व नागपूरच्या डॉ. माधवी मार्डीकर, तर चवथ्या सत्रात कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचे डॉ. अजय बोंडे व अमरावतीचे श्री आशिष देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. समारोपीय समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रविण रघुवंशी उपस्थित होते.

## नवभारत

**समारोह** सेवानिवृत्त कर्मचारियों के सत्कार में उपकुलपति बारहाते का प्रतिपादन

# निष्ठावान कर्मियों से विवि बना गतिशील

शैक्षणिक




■ अमरावत. ब्यूरो. उपकुलपति डॉ. मिलिंद बारहाते ने कहा कि कर्मचारियों के अपने मातृ संस्थान के प्रति प्रेम और निष्ठा के कारण विश्वविद्यालय गतिशील है. वे संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के कर्मचारियों की सेवानिवृत्ति के अवसर पर आयोजित समारोह में अध्यक्ष पद से बोल रहे थे. मंच पर मुख्य अतिथि वाणिज्य एवं प्रबंधन संकाय के प्रभारी डीन और प्रबंधन परिषद के सदस्य डॉ. डी.डब्ल्यू. निचित, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी, परीक्षा एवं मूल्यांकन मंडल के संचालक डॉ. नितिन कोली, उपकुलपति राहुल नरवड़े, विश्वविद्यालय कर्मचारी संघ के अध्यक्ष अजय देशमुख, विशिष्ट अतिथि सुनीता मंगरुलकर, मंगरुलकर, विट्ठलराव मारापे, मारापे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित थे.

**समाज को कुछ देकर संतोष होता : मंगरुलकर :** उपकुलपति ने सेवानिवृत्त कर्मचारियों के अच्छे स्वास्थ्य की कामना की. इस अवसर पर बारहाते ने मंगरुलकर, विट्ठलराव मारापे का अनुपमा देशमुख ने तथा मारापे का पूनम जाधव ने साड़ी तथा कुंकवा कप देकर सम्मान किया. मुख्य अतिथि डॉ. डी.डब्लू. निचित ने कहा कि विश्वविद्यालय के कर्मचारी निष्ठा से काम करते हैं. उन्होंने सम्मानितों को भविष्य के लिए शुभकामनाएं देते हुए कहा कि वे अपने काम के प्रति निष्ठावान हैं. इस अवसर पर सम्मानित मंगरुलकर ने कहा कि मातृ संस्था से सेवानिवृत्त होना हृदय विदारक है. मातृ संस्था तथा समाज को कुछ देकर संतोष होता है तथा सेवा की सुखद यादें सदैव स्मृति में रहेंगी. विट्ठलराव मारापे ने कहा कि सेवा के दौरान मुझे साथी कर्मचारियों से बहुत प्यार मिला. विश्वविद्यालय एक परिवार है. विश्वविद्यालय का ऋण कभी नहीं चुकाया जा सकता. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तथा आभार अधीक्षक धनंजय पाटिल ने माना. कार्यक्रम में विश्वविद्यालय के विभिन्न प्राधिकरणों के सदस्य, विश्वविद्यालय के सभी शैक्षणिक और प्रशासनिक विभागों के प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक और सम्मानित होने वालों के परिवार के सदस्य उपस्थित थे.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

### मार्गदर्शक



**श्री सी. पी. राधाकृष्णन**

**मा. राज्यपाल तथा कुलपती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**

**मा. कुलगुरू**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**

**मा. प्र-कुलगुरू**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### प्रकाशक



**डॉ. अविनाश असनारे**

**कुलसचिव**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### संपादक



**डॉ. विलास नांदुरकर**

**जनसंपर्क अधिकारी**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ